अंतरलहरी

कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, मुंबई

मे - ऑगस्ट २०२० वर्ष १३ अंक १ पृष्ठ १२ रु. २/-

एकत्र विचार करण्याची कला

मला वाटते एकत्र विचार करण्याची कला शिकणे महत्त्वाचे आहे. वैज्ञानिक आणि अगदी न शिकलेली माणसे विचार करतात. त्यांच्या व्यवसायाप्रमाणे, त्यांच्या विशिष्ट क्षेत्रातल्या प्राविण्यामध्ये, त्यांच्या श्रद्धा, अनुभवांप्रमाणे विचार करतात. आपण सर्व वस्तुनिष्ठपणे किंवा आपला जिथे कल असेल त्याप्रमाणे विचार करतो, परंतु कधीही आपण मिळून विचार करतो, एकत्र निरीक्षण करतो असे दिसत नाही. आपण कोणत्याही गोष्टीसंबंधी विचार करीत असलो, एखादी समस्या, एखादा अनुभव ह्यासंबंधी विचार करीत असलो तरीही हे विचार करणे, एका विशिष्ट विषयाचा विचार करणे नव्हे, तर एकत्र विचार करण्याची क्षमता असणे - ही अगदी वेगळी गोष्ट आहे. जगात घडत असलेल्या मोठ्या आपत्त्यांना - धोके, आतंकवाद, युद्धाची अंतिम क्रूरता - ह्यांना तोंड देताना एकत्र विचार करण्याची आवश्यकता आहे. भांडवलशाही, समाजवादी, कट्टर डावे किंवा उजवे बनून पाहणे नव्हे तर सर्वांनी एकत्र येऊन ते पाहणे; आपण ह्या सडक्या अवस्थेपर्यंत कसे आलो हे फक्त पाहणे नव्हे तर त्यातून बाहेर कसे पडू शकू हे सुद्धा एकत्र येऊन पाहणे जरूरीचे आहे. धंदेवाईक किंवा राजकारणी त्या समस्येकडे त्यांच्या मर्यादित दृष्टिकोनातून पाहतात, परंतु मला असे सांगायचे आहे की आपण जीवनाकडे एक समग्रता म्हणून पाहिले पाहिजे; हा ब्रिटिश, हा फ्रेंच, हा चिनी म्हणून नव्हे.

जीवनाकडे समग्रतेने बघायचे म्हणजे काय? ह्याचा अर्थ माणसाने स्वत:कडे कुठल्याही राष्ट्रीय विभाजनाशिवाय पाहणे, आदि, अंत, काल, मृत्यू ह्याशिवाय जीवन हा एकच ओघ आहे असे पाहणे. ही समजण्यास कठीण गोष्ट आहे. कारण आपण काही अंशाचाच विचार करतो, समग्रतेचा नाही. जीवनाच्या भागांमधून त्याची समग्रता समजेल ह्या आशेने आपण त्याचे विभाजन करतो.

एकत्र विचार करण्याची कला काळजीपूर्वक अभ्यासली पाहिजे, हे सर्व शक्य आहे की नाही हे पडताळून पाहण्यासाठी परीक्षण केले पाहिजे. आपल्या विशिष्ट प्रतिक्रिया, अनुभव, पूर्वग्रह ह्यानुसार प्रत्येक जण स्वत:च्या विचारसरणीला चिकटून राहतो. अशा प्रकारे आपण संस्कारबद्ध झालो आहोत आणि हे आपल्याला एकत्र करण्याची क्षमता संपादण्यापासून वंचित करते. एकत्र विचार करणे म्हणजे मनाने एक होणे नव्हे. आपली मने एखाद्या आदर्शासंबंधी, ऐतिहासिक निष्कर्षासंबंधी किंवा तात्त्विक कल्पनांसंबंधी एकत्र येऊन त्यासाठी कार्य करतील, परंतु ही सर्व प्रक्रिया प्रामुख्याने अधिकारवादावर आधारलेली आहे. स्वातंत्र्य हे एकत्र विचार करण्याचा गाभा आहे. तुम्ही तुमच्या कल्पना, पूर्वग्रह वगैरेंपासून मुक्त असायला हवे, मी देखील मुक्त असायला हवे. मग आपण त्या मुक्तीमध्ये एकत्र येतो. असे होणे म्हणजे आपले सर्व संस्कार गळून पडणे. ह्यामध्ये भूतकाळाशिवायचे संपूर्ण अवधान अभिप्रेत आहे. ह्या वर्तमानातील अतिशय बिकट काळात आपण आपल्या टोळीवादी प्रवृत्त्या - ज्यांचं राष्ट्रवादाच्या रूपाने उदात्तीकरण झालं आहे - त्या पूर्णपणे सोडून दिल्या पाहिजेत. स्वार्थवृत्ती पूर्णपणे त्यागणं आणि ब्रिटिश, अरब, रशियन इ. म्हणून स्वत:ची बाळगलेली ओळख पूर्णपणे त्यागणं हे एकत्र विचार करण्यामध्ये अभिप्रेत आहे.

मग स्वार्थाच्या विभाजनवादाच्या संकटाला तोंड देताना माणसाने काय करावे? एकमेकांवर आर्थिक व राजकीय सत्ता मिळविण्याची चळवळ चालू आहे, किंवा एखाद दुसऱ्या कडव्या व मानसिक संतुलन सुटलेल्या नेत्यांची विस्तारवादी हालचाल चालू आहे. मग माणसाने ह्याला तोंड देत असताना काय करावे? एक तर तुम्ही त्याकडे पाठ फिरवता व उदासिनतेच्य कोशात शिरता किंवा राजकीय चळवळीत सामील होता, किंवा एखाद्या धार्मिक पंथाचा आसरा घेता. तुम्ही त्यातून सुटका करून घेऊ शकत नाही. ते संकट असतेच.

मी काय करावे? ह्या आजच्या सामाजिक रचनेच्या घड्या मी नाकारतो, अर्थहीन अधार्मिक पद्धती मी नाकारतो. हे सर्व झिडकारतो. मग मी संपूर्ण एकटा असतो. हा पूर्ण विलगपणा म्हणजे जगातील सत्यापासून दूर पळून एक प्रकारच्या हस्तिदंती मनोऱ्यात दडून बसणे नव्हे, किंवा एखाद्या स्वप्नाळू आभासात हरवणे नव्हे. स्वार्थ आणि राष्ट्रवादामागे धावण्यातील, विस्तारवादातील, अधार्मिक जीवनातील निष्फळता आणि विभाजन मी पाहतो, म्हणून ह्या समाजाची संपूर्ण विध्वसंकता मी झिडकारतो. म्हणून मी एकटा उभा राहतो. मी माणसाच्या विध्वंसक मनोधारणेमध्ये मानसिकरित्या भर घालीत नाही म्हणून चांगुलपणा, करुणा आणि प्रज्ञा आहे त्या प्रवाहात मी आहे. ती प्रज्ञा कार्यरत आहे, आजच्या जगातील वेडेपणाला ती तोंड देत आहे. जिथे कोठे काही विरूप असेल तिथे ती प्रज्ञा कार्यरत होईल.

The Whole Movement of Life is Learning - Letters to his Schools, Chpt 40

संवाद अतिशय महत्त्वाचा आहे. संवाद, जिथे प्रश्न आणि उत्तर ह्या दोन्ही गोष्टी काही काळापुरत्या चालू राहतात पण मग एक क्षण असा येतो - जिथे उत्तराविना प्रश्न तसाच सोडला जातो. ज्या दोन व्यक्ती ह्या प्रश्नोत्तरात सहभागी झालेल्या असतात त्यांच्यामध्येच तो हेलकावत राहतो... नुकतीच उमलणारी कळी जशी अस्पर्शित असते तशीच ही गोष्ट आहे... जर विचाराचा जरासाही स्पर्श होऊ न देता एखादा प्रश्न तसाच सोडून दिला, तर त्या प्रश्नाला स्वत:चंच असं उत्तर सापडतं कारण इथे प्रश्नकर्ता आणि उत्तरदाता दोघेही अंतर्धान पावलेले असतात. हा संवादाचा असा एक प्रकार आहे ज्यात शोधाची तीव्रता आणि खोली विशिष्ट उंची गाठेपर्यंत वाढत जाते आणि तो दर्जा - ती उंची विचाराला कधीच गाठता येत नाही.

On Study Centres, मद्रास, २६ जानेवारी १९८४

संपादकीय

'वद' हा संस्कृत धातू, याचा सरळ अर्थ 'बोलणे'. मागेपुढे प्रत्यय लावून बोलण्याला अनेक रंग, छटा दिल्या जातात. उदा. संवाद, वाद, वितंडवाद, सुसंवाद वगैरे.

कृष्णमूर्तींच्या शिकवणुकीच्या संदर्भात 'संवाद' ह्या प्रक्रियेला एक वेगळाच आयाम आहे. बोलणे, ऐकणे, प्रतिसाद देणे हे सर्वच यात सामावलेले आहे. तिथे बोलणे हे शब्दापलीकडे नेऊ शकते. ऐकणे हे पूर्वग्रहदूषित नसते आणि उत्स्फूर्ततेने येणाऱ्या प्रतिसादामध्ये पारदर्शिकता असते, प्रामाणिकपणा असतो, त्यामुळे विश्वास निर्माण होतो.

ज्या विषयावर संवाद घडतो तो विषय बोलणाऱ्याच्या तळमळीतून, कळकळीतून खुलत असतो. संवाद हा वाद नसतो, चर्चा नसते, यात आपली मते इतरांना पटवून देणे नसते, यात कोणीही मार्गदर्शक अधिकार गाजवत नसतो आणि तरीही तिथे सुव्यवस्था असते. ती अतरंगात असते.

संवादामध्ये इतरांचे म्हणणे समजून घेण्यासाठी मनातले सर्व आडपडदे विरून जातात. संवाद तेव्हाच घडतो जेव्हा अहंकार नसतो, कमालीची विनम्रता असते. संवादातून प्रज्ञा उदय पावू शकते, जी जाणीवेत परिवर्तन घडवू शकते. परंतु आपण 'मी'मध्ये अडकलेलो आहोत. अथकपणे शोध घेऊन जरी या सत्याचा उलगडा झाला तरीही तसे जगणे शक्य होत नाही, असे दिसते.

संवादातून काही निष्पन्न होणार की नाही ह्याचा विचार करण्यात ऊर्जेचा व्यय न करता इतरांच्या संगतीतही प्रामाणिकपणे आपल्या स्वत:च्या मनोव्यापाराचे अवधान ठेवणे एवढेच आपल्या हातात आहे असे दिसते. कदाचित संवाद जर शब्दाच्या जाळ्यातून सुटला - म्हणजेच त्यात विचाराला मागे टाकले गेले, तर सत्य उभे ठाकेल.

...सद्य परिस्थितीत उभे जग कोरोनाच्या रूपाने एका भयंकर संकटाच्या छायेत अंधारात चाचपडल्याप्रमाणे गोंधळात मार्ग शोधत आहे, एकमेकांचे सहकाराचे हात शोधत आहे. तेव्हा संवाद -कृष्णमूर्तींना अभिप्रेत असलेला संवाद - अतिशय महत्वाचा आहे. 'आपण व जग वेगळे नाही', ह्या कृष्णमूर्तींच्या उक्तीची झलक दिसू लागली आहे - अर्थात गंभीर विचार करणाऱ्यांसाठी.

ह्या साथीने जगाला पूर्णपणे वाकवले आहे, सर्वांनी भेदभाव विसरून आज खऱ्या अर्थाने एकत्र विचार करण्याची वेळ आली आहे. कारण संकट एका देशावर, एका धर्मावर, एका आदर्शवादावर नाही, तर मानवी वंशावर, त्याच्या अस्तित्वावर आहे. परंतु एकत्र विचार करणे म्हणजे काय? सर्व देश समान पातळीवर संशोधन करण्याचे, समान नियम पाळण्याचे जोरदार प्रयत्न करत आहेत. अनेक राष्ट्रे, वैज्ञानिक, राजकारणी एकत्र विचार करून परिस्थितीवर तात्पुरता ताबा मिळवतीलही. परंतु जोपर्यंत मानवी मनाची मूलभूत समस्या समजत नाही तोपर्यंत एकत्र विचार होणे नाही. संकटे दुसऱ्या रुपाने उभी राहतील.

एकत्र विचार करणाऱ्या मनाच्या गुणवत्तेविषयी कृष्णमूर्ती म्हणतात की ही गोष्ट कठीण आहे, परंतु तिला पर्याय नाही. तेव्हा ती समजणे महत्वाचे आहे. कृष्णमूर्ती अनेक वेळा, अनेक प्रकारे एकत्र विचार करणाऱ्या, सुसंवाद करणाऱ्या मनाविषयी बोलले आहेत. इथे आपल्याला काय समजते, काय अशक्य वाटते हे समजणे महत्वाचे आहे. जर मनामध्ये विसंगती नसेल तर 'मी'ची भावना विरून जाते, चर्चा, वाद, वितंडवाद थांबतो. पैसा, प्रतिष्ठा ह्या गोष्टींना जागा नसते. ती मने एकत्र येतात, ती सत्य पाहू शकतात, बोलू शकतात, ऐकू शकतात.

आज ह्या साथीसारख्या जागतिक संकटाच्या वेळी सामान्य माणूसही पाहू शकतो की आपले हितसंबंध एकत्र गुंतलेले आहेत. ही संकल्पना नाही. हे संकट जाईल पण त्यातून मिळालेली दृष्टी - म्हणजे माणसामाणसातील अंतर, माणूस आणि निसर्ग ह्यातील अंतर हे भ्रम आहेत ही समज - जर जागृत राहिली तर उद्याचे जग वेगळे असेल.

जे. कृष्णमूर्तींचं जीवन आणि शिकवण

श्री. मार्क ली ह्या प्रदीर्घ काळ कृष्णमूर्तींचे सहकारी असलेल्या आणि कृष्णमूर्ती फाउंडेशनच्या अमेरिका आणि भारत येथील संस्थांच्या विश्वस्तपदाची धुरा सांभाळणाऱ्या त्यांच्या सुहृदाने लिहिलेलं कृष्णमूर्तींचं हे जीवनचरित्र नवी दिल्ली येथील 'हे हाऊस' ह्या प्रकाशनाने आंतरराष्ट्रीय आवृत्तीच्या स्वरूपात प्रकाशित केलं आहे. भारतीय तरुण वर्गाला ह्या पुस्तकाच्या रूपाने विसाव्या शतकातील ह्या महत्त्वाच्या तत्वचिंतकाच्या कार्याची माहिति करून देणारं एक छोटं - सहज समजू शकेल असं पुस्तक उपलब्ध करून द्यावं हा ह्या प्रकाशनामागचा हेतू आहे. ह्या पुस्तकांचं प्रकाशन कृष्णमूर्तींच्या १२५ व्या जन्मदिनी करण्यात आलं हा एक सुखद योगायोग आहे.



ह्या पुस्तकाबद्दलचा आपला अभिप्राय देताना प्राध्यापक आणि लेखक रवी रविंद्र म्हणतात, 'हे पुस्तक थोडक्यात पण अतिशय नेमकेपणाने, जे. कृष्णमूर्ती यांचं जीवन आणि शिकवण यांची ओळख करून देतं'. पुस्तकाचे लेखक श्री. मार्क ली यांनी आधुनिक काळाला अनुरूप अशा भाषेचा वापर केला आहे पण कृष्णमूर्तींची शिकवण मात्र त्यांच्याच शब्दात दिली आहे. कृष्णमूर्तींविषयी, त्यांच्या प्रगाढ शिकवणीविषयी वाचन करणं हा खरोखरच अतिशय चित्तवेधक आणि आव्हानात्मक अनुभव असतो.

ह्या पुस्तकात कृष्णमूर्तींचं जीवन, त्यांचे प्रवास आणि व्याख्यान ह्यांचा कालानुक्रम समाविष्ट आहे. २०४ पृष्ठांच्या ह्या पुस्तकाची किंमत रु. ३५०/- आहे आणि ते फाउंडेशनच्या संकेतस्थळांवरही उपलब्ध आहे. ह्या पुस्तकातील काही उताऱ्यांच्या मराठी अनुवादाचा ह्या वृत्तपत्रिकेत समावेश केला आहे.

त्यांचं जीवन आणि त्यांची शिकवण ह्यात एकवाक्यता होती

एखाद्या व्यक्तीची जीवनकथा सांगताना - विशेषत: जी व्यक्ती प्रसिद्ध आहे, सार्वजनिक जीवनात जिला महत्त्वाचं स्थान आहे अशा व्यक्तीचं जीवन उलगडताना, बऱ्याच वेळा असं दिसून येतं की तिचं खाजगी जीवन आणि सार्वजनिक जीवन यात फरक आहे - काही व्यक्तींच्या जीवनात तर खाजगी जीवन आणि सार्वजनिक जीवन यात इतका फरक असतो की त्या दोन निराळ्या व्यक्ती आहेत असंच वाटतं. कृष्णमूर्ती म्हणत की ते काहीसे संकोची आहेत व आपला खाजगीपणा जपणं ते पसंत करतात. असं असलं तरी एक जगद्गुरु ह्या नात्याने सार्वजनिक स्तरामधील त्यांचा वावर आणि त्यांचं खाजगी जीवन यात काही फरक दिसून येत नसे. त्यांचं जीवन आणि त्यांची शिकवण ह्यात एकवाक्यता होती. त्यांच्याबरोबर राहिलेली, ज्यांनी त्यांच्याबरोबर काम केलं अशी किंवा ज्यांनी त्यांची व्याख्यानं ऐकली आहेत अशी हजारो माणसं ह्याची ग्वाही देतात.

किशोरवयापासून ते आयुष्याच्या अखेरपर्यंत कृष्णमूर्ती सत्य - सापेक्ष नव्हे, निरपेक्ष (absolute) केवलसत्य अंगीकारत व इतरांपुढे विशद करत जगले. दुर्मिळ म्हणावं असं जीवनयापन होतं हे. सत्य 'कृष्णमूर्ती'चं नव्हतं, कोणत्याही धार्मिक वा अधार्मिक अधिकारवाणीतून आलेलं नव्हतं. ते प्राचीन किंवा अर्वाचीन अशा प्रकारचंही नव्हतं. कृष्णमूर्तींनी आपल्या श्रोत्यांबरोबर संवाद साधत त्यांनाही ह्या शोधात सामील करून घेतलं होतं आणि माणसाची विचारशक्ती आणि जीवन ह्याचं सत्यस्वरूप उघड केलं होतं. श्रोत्यांना बरोबर घेऊन, विचारणा करण्याच्या प्रक्रियेमधून ते अशा जीवनपद्धतींचा शोध घेत होते जी सामान्य माणसाला, अगदी साधं जीवन जगणाऱ्या माणसालाही स्वत:च्या जीवनात बदल घडवून आणण्यासाठी प्रेरणा देऊ शकेल आणि सहजपणे, शांतपणे तणावमुक्त जीवन जगण्याचा अनुभव देऊ शकेल.

आपल्याला जग बदलायचं असेल तर स्वत:पासून सुरुवात करावी लागेल; आणि स्वत:पासून सुरुवात करताना सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे आधी आपला हेतू-उद्देश काय आहे हे आपल्याला समजून घ्यावं लागेल. स्वत:ला समजून घेणं हा आपला हेतू असला पाहिजे. इतरांनी स्वत:मध्ये बदल घडवून आणावा किंवा डाव्या किंवा उजव्या विचारांच्या क्रांतीच्या माध्यमातून बदल घडवून आणावा हे इथे अभिप्रेत नाही. बदल घडवून आणणं ही आपली - तुमची आणि माझीही जबादारी आहे. हे आपण समजून घेतलं पाहिजे कारण आपण राहतो ते जग कितीही छोटं असलं तरी आपण स्वत:ला बदलू शकलो, आपल्या दैनंदिन जगण्याचा केंद्रबिंदूच बदलू शकलो तर कदाचित त्याचा एकंदर जगावर, इतरांशी असेल्या नातेसंबंधावर मोठ्या प्रमाणात प्रभाव पडू शकेल. (प्रथम अर्थात अंतिम मुक्ती)

प्रौढावस्थेत - स्वतंत्रपणे जगत असताना, 'मानवाला संपूर्णपणे मुक्त करणं' हेच त्यांचं ध्येय होतं - विलक्षण वेगळं असं हे ध्येय, मानसिकदृष्ट्या संपूर्णपणे मुक्त अशी व्यक्तीच अशा ध्येयाचा विचार करू शकेल. ह्या ध्येयामुळेच त्यांना जाहीर सभा आणि बैठका, लेखन, प्रकाशनं आणि किशोरवयीन व तरुण मुलांचं शिक्षण ह्या गोष्टींवर काम करण्यासाठी प्रेरणा मिळाली. त्यांचं प्रौढावस्थेतील संपूर्ण जीवन हे जास्तीतजास्त लोकांना भेटणं, त्यांच्याशी बोलणं, त्यांचे प्रश्न समजून घेणं यासाठीच होतं. युद्धं, नैसर्गिक आपत्ती, राजकीय वादळं, हवामानातले चढउतार, अपुरा निधी ह्या गोष्टीही असायच्याच. अडुसष्ट वर्षं ते बोलत होते - आपली शिकवण जगापुढे सांगत होते. त्यांची व्याख्यानं आणि संवाद यांची संख्या पाहिली की वाटतं - जगाच्या इतिहासात त्यांच्याइतका लोकसंवाद फार थोड्या लोकांनी साधला असेल. त्यांच्या लोकसंवादाची एकूण व्याप्ती पाहिली की 'ते जगद्गुरु होणार' हे त्यांच्याबद्दल केलेलं भाकीत एका अर्थाने खरं ठरलं असं वाटतं.

ते नेहमी सांगायचे की त्यांची शिकवण आणि त्यांचं रक्षण ह्यांचा उगम त्यांच्या मनातून होतो. त्यांचं मन असाधारण आहे; ते नेहमी कोरं - रिकामं असतं. त्यामुळेच अनुभव, शिक्षण, रंगीबेरंगी उत्सव, समारंभ आणि विधी यांचा त्यांच्या मनावर काही परिणाम होत नसे. त्यांचे कोरे शब्द त्या रिकाम्या मनातून यायचे; त्यांची व्याख्यानं, त्यांचा संवाद उत्स्फूर्त असे. स्थळ, काळ आणि कोणतेही विशिष्ट श्रोते ह्या गोष्टींचा त्यावर काही परिणाम होत नसे. त्यांचे शब्द कालातीत असत आणि जरी ते फक्त इंग्रजी भाषेतून संवाद साधत असले तरीही त्यांच्या बोलण्यातलं मर्म हे वैश्विक होतं आणि सुबोध होतं.

आजची युवा पिढी वेगवेगळ्या प्रकारच्या आभासी वास्तवात (virtual reality) जगते. अनुभवाच्या कक्षेबाहेर आता काहीच राहिलं नाही कारण (आभासी) 'अनुभव' हे स्वत:च स्वत:साठी एक वास्तव बनलं आहे. तेव्हा अनुभवकर्त्याबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण होणं दूरच. अनुभव घेणारी व्यक्ती ही संस्कारित असते, तिचा अनुभवही ताजा-खास स्वत:चा असा नसतो, ही व्यक्तीही इतरांच्या प्रभावाखाली येऊ शकते, हे जोपर्यंत आपल्याला कळत नाही तोपर्यंत आपण अनुभवालाच प्राधान्य देत राहतो - तो अनुभव नसून आभास आहे हे आपल्याला समजत नाही, हे कृष्णमूर्तींनी स्पष्टपणे दाखवून दिलं. त्यांचे श्रोते आणि वाचक त्यांची शिकवण 'अनुभवण्याचा' प्रयत्न करत आहेत, हे जेव्हा त्यांना जाणवलं तेव्हा हेच सत्य त्यांना विशद करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. सरलतेने, विचाराविना ऐकणं हेच खरं, कारण असं 'ऐकणं हाच गुरु असतो'.

***

अधिकतर होमो सेपियन्स् (उत्क्रांत मानव) बऱ्याच प्रमाणात निसर्गापासून, जे नैसर्गिक वातावरण समृद्धपणे, क्षमाशीलपणे अब्जावधी वर्षं जीवनाच्या वेगवेगळ्या गरजांची पूर्ती करत आहे त्यापासून फटकून का राहतात? अवघं विश्व पुन्हा पुन्हा साद घालून आपल्याला बोलावत असताना आपण मात्र आपले सवतेसुभे राखत का बसतो, आपल्या छोट्याशा जगाला कवटाळून का बसतो? पंचेंद्रियं, आपल्या संवेदना-जाणीवा ह्या सर्व गोष्टींना सारखंच महत्त्व न देता, प्रामुख्याने आपण आपल्या मेंदूला-डोक्याला का अधिक महत्त्व देतो?

आपण सर्वांनी वैयक्तिक आणि सामुहिक पातळीवर हे साधे प्रश्न स्वत:ला विचारले नाहीत, आणि सातत्याने तणावाच्या प्रसंगांना तोंड देत असतानाही ह्या गोष्टींची गांभीर्याने दखल घेतलेली नाही. प्रश्नकर्ता स्वत:ला प्रश्नापासून विलग करतो आणि त्यामुळे जे अंतर निर्माण होतं ते भरून काढता येत नाही. जे मन प्रश्न निर्माण करतं त्याच मनाकडून इथे ठोस उत्तराची अपेक्षा केली जाते.

आणि मग कृष्णमूर्तींचा प्रवेश होतो - एक अशी व्यक्ती जी कोणत्याही देशाशी, धर्माशी श्रद्धाकेंद्राशी किंवा विचारप्रणालीशी जोडलेली नाही. अतिशय पारंपरिक वातावरणात वाढलेली ही व्यक्ती, नव्या शतकातला नवा आवाज घेऊन लोकांसमोर आली, सांस्कृतिक,

धार्मिक आणि मानसिक बंधनांतून लोकांना मुक्त करण्याच्या निर्धाराने आली. क्रांतिकारी, मूर्तीभंजक, रक्षणकर्ता ह्यापैकी कोणतंही विशेषण कृष्णमूर्तींच्या बंडाची ताकद जाणवून देण्यासाठी अपुरं पडेल. त्यांना एखादा नवा धर्म, पंथ स्थापन करायचा नव्हता किंवा एखादं तत्त्वज्ञानही लोकांपुढे आणायचं नव्हतं. कृष्णमूर्तींमध्ये घडून येणारी वास्तवाची जागृती तत्काळ होती. तीत पांडित्याचं अवडंबर नव्हतं, ती कूटसंकेतात गुरफटलेली नव्हती. त्यांच्या म्हणण्यानुसार संस्कारांची पुटं दूर करू शकणारी, चेतनेत परिवर्तन घडवून आणणारी अशी ही जागृती होती. मनोवैचारिक मुक्तत्वाचं हे द्वार होतं.

***

कृष्णमूर्तींनी स्पष्टपणे सांगितलं की धार्मिक जीवनात विकास किंवा प्रगती यासारख्या गोष्टी नसतात. 'प्रगती' हे खरं तर काळाच्या फसव्या निरंतरतेचं रूप आहे.

प्रगती किंवा विकास यांसारखी एखादी गोष्ट असते का? तांत्रिक विकास म्हणजे काय हे मला माहीत आहे. अधिकाधिक प्रभावी यंत्रसामग्री आणि त्याच्याशी निगडित अन्य गोष्टी म्हणजे तांत्रिक विकास; पण इथे तुमचा आणि माझा काही विकास होतो का? अशी कोणती गोष्ट आहे जी विकसित होत जाते आणि तिथे कशाचा विकास होत असतो? अज्ञानाचं कधीही ज्ञानामध्ये रूपांतर होत नाही; हाव-अधाशीपणा हा नेहमी अधाशीपणाच राहणार - फार फार तर तो वाढेल. काळाबरोबर पुढे जाताना अज्ञानाचं ज्ञानामध्ये रूपांतर होणार नाही. ज्ञान हवं असेल तर अज्ञानाला नाहीसं व्हावं लागेल. लोभ नाही अशी स्थिती अनुभवण्यासाठी लोभाचं संपूर्णपणे उच्चाटन होणं आवश्यक आहे. म्हणजेच, जेव्हा आपण सुधारणा किंवा विकास यासारख्याा गोष्टींबद्दल बोलत असतो तेव्हा आपण कोणीतरी बनण्याविषयी बोलत असतो; मी असा आहे आणि मी असा बनेन; मी कारकून आहे आणि आणि व्यवस्थापक बनणार आहे; मी पादरी आहे आणि बिशप बनणार आहे; मी गरीब आहे आणि श्रीमंत बनणार आहे; आज मी वाईट व्यक्ती आहे, पण हळूहळू मी भला माणूस बनणार आहे. अशा प्रकारे स्वत:मध्ये बदल घडवून आणण्याच्या ह्या प्रक्रियेलाच आपण सुधारणा किंवा विकास असं नाव देतो; पण खरं तर हा आतापर्यंतच्या तुमच्या प्रवासाचाच एक टप्पा असतो, आतापर्यंत जी वाट चालत आलात तिचं एक सुधारित वळण! जे निरंतर आहे तेच तुम्ही पुढे नेत आहात - फक्त थोड्या सुधारित स्वरूपात! म्हणूनच तुम्ही ज्याला प्रगती म्हणता तशा प्रगतीचा मार्ग स्वीकारला तर परिस्थितीत आमूलाग्र बदल घडणं शक्य नाही. (मुंबई, १९४८, जाहीर भाषण)

कृष्णमूर्तींनी अत्यंत नेटाने खूप प्रवास केला आणि वेगवेगळ्या देशांमधल्या, वेगवेगळ्या परिस्थितीतल्या असंख्या लोकांशी अतिशय प्रेमाने संवाद साधला. यामध्ये उच्च पदांवरचे बुद्धिवंत, विविध धर्मांतील पंडित आणि सर्वसामान्य लोक अशा सर्व स्तरावरील लोकांचा समावेश होतो. ह्या संवादामध्ये सातत्याने त्यांनी एका अतिशय प्रभावी अशा सत्याकडे लोकांचं लक्ष वेधून घेतलं; 'जिथे अहंकार असतो तिथे सत्य असू शकत नाही'. ते अत्यंत साध्या भाषेत बोलायचे, त्यात बौद्धिक आवेश नसायचा, आणि त्यामुळेच त्यांच्या शब्दांमधलं सत्य थेट लोकांच्या मनापर्यंत पोहोचायचं - आणि विचार थांबायचे. संस्कृतमध्ये 'स्फोट' असा शब्द आहे - त्याचा प्रत्यय ही भाषणं ऐकताना येत असे - इथे शब्द आणि त्यांच्या अर्थाला फारसं महत्त्व नसायचं तर त्याच्या पलीकडे असलेल्या अंतर्दृष्टीचा प्रत्यय यायचा.

कृष्णमूर्ती पुन्हा पुन्हा सांगायचे, 'शब्द म्हणजे वस्तू नाही', 'शब्दांना महत्त्व नसतं', 'शिक्षण पुस्तकांमधून मिळत नसतं'. त्यांच्या अशा गूढ बोलण्यामुळे असा प्रश्न पडतो की शब्दांमुळे काहीच फरक पडत नसेल तर मग आपल्या आयुष्याची जवळपास पासष्ट वर्षं त्यांनी लाखो शब्दांत जगाशी संवाद साधला, ते कशासाठी? शब्द म्हणजे दुसरं-तिसरं काही नाही, आपली वस्तूस्थिती दर्शवणारा तो एक आरसा आहे - आपण काहीतरी बोध घ्यावा यासाठी आपल्याला मिळालेला एक आरसा! आणि बोध घेणारं आपलं मन, सत्याची व्याख्या करण्यासाठी नाही, तर ते शोधून काढण्यासाठी, शंका उपस्थित करण्यासाठी आणि सत्य म्हणजे नेमकं काय हे समजून घेण्यासाठी शब्दांचा वापर करतं.

कृष्णमूर्तींना नेमकं काय सांगायचं होतं? ते म्हणायचे, आपल्याला एखाद्या गोष्टीतलं सत्य दिसतं, तो अनुभव स्फोटक, आपल्या अंतर्मनापर्यंत पोहचणारा असाही असू शकतो; क्षणार्धात येणारा हा प्रत्यय - त्या आकलनामध्ये कसलीही हालचाल नसते - परिस्थिती, स्थळ आणि विचार ह्या कशाचाही प्रभाव नसतो. इथे कृष्णमूर्तींची शिकवण समजून घेणं महत्त्वाचं नसतं; वास्तव समजून घेणं, स्वत:ला समजून घेणं ह्या गोष्टी इथे महत्त्वाच्या ठरतात.

स्वत:ला समजून घेतल्याशिवाय काहीही कळत नाही; पण स्वत:ला समजून घेणं म्हणजे स्वत:विषयी माहिती गोळा करणं नव्हे; माहिती गोळा केल्यामुळे शिकण्यात अडथळा येतो. शिकणं ही संग्रह करण्यासारखी गोष्ट नाही; शिकत असताना प्रत्येक क्षण नवा असतो - ताजा असतो; एखाद्या गोष्टीचं आकलन होणंही असच असतं. शिकण्याची ही संपूर्ण प्रक्रिया म्हणजे चिंतनशीलतेत होणारा विस्फोट आहे. (Krishnamurti's Notebook - दैनंदिनी)

***

जीवनात रहस्यमय अशा गोष्टीही असतात ह्या गोष्टीची जाणीव कृष्णमूर्तींनी लोकांना करून दिली. पण त्यांचा अर्थ कसा लावायचा याबद्दल मात्र काहीच स्पष्टीकरण किंवा मार्गदर्शन केलं नाही. एका अर्थाने त्यांची शिकवण गूढ आहे, सहजासहजी तिचा अर्थबोध होत नाही; चित्त एकाग्र करून ती समजून घ्यावी लागते, त्यांच्या शब्दांमागे दडलेला अर्थ शोधावा लागतो. ही शिकवण समजून घेण्यासाठी द्रष्ट्याचं मन असावं लागतं. ग्रीक लोक सांगतात त्याप्रमाणे 'जे प्रतिमा आणि कल्पना ह्यांच्या आड दडलेल्या गोष्टी थेटपणे पाहू शकतं' असं मन! आणि मनाचं हे जाणतेपण ही एका अर्थाने कृतीच असते.

कृष्णमूर्तींच्या व्यक्तिमत्त्वातली गूढता कोणालाही सहजपणे जाणवेल अशी गोष्ट होती. त्यांच्या सहवासात असताना सूक्ष्मपणे पण सातत्याने आपण एका सामर्थ्यवान व्यक्तीबरोबर आहोत याची जाणीव होत असे. ते बरोबर असताना, त्यांच्या शारीर अस्तित्वाच्या प्रभावामुळे साऱ्या वातावरणात असीम शांतीचा प्रत्यय येत असे. जाणीवेच्या पातळीवर ह्या अनुभवांचं वर्णन करणं अशक्य आहे पण एका गोष्टीचा मात्र निश्चितच उल्लेख करता येईल. त्यांच्या बरोबर वावरताना मन अधिक जागृत होत असे, विचार अधिक स्पष्ट होत असत आणि संवेदनशीलतेची पातळी उंचावत असे. मी एकदा गंभीरपणे पण काहीशा अनिश्चित मन:स्थितीत त्यांना विचारलं, 'पावित्र्य हा एखाद्या व्यक्तीमध्ये खरोखरच असलेला, जाणवणारा, निसर्गामध्ये असलेला किंवा एखाद्या स्थळामध्ये जाणवणारा गुण आहे का? खरं म्हणजे हा प्रश्न मी त्यांना उद्देशूनच विचारला होता पण त्यांच्याबरोबर असं थेटपणे बोलायला मी संकोचत होतो. मला उत्तर देताना कृष्णमूर्ती म्हणाले, 'पावित्र्य सर्व

ठिकाणी असतं, आणि खरं सांगायचं तर जे शुद्ध असतं ते पवित्रही असतंच पण जेव्हा आपण - आपला 'अहं' किंवा 'मी'पणा - विराम पावतो तेव्हाच ते प्रगट होतं.

मी अगदी स्तब्ध झालो, तरीही त्या एका क्षणात एका विशाल विश्वाचं दर्शन झालं - अगदी जवळून. कृष्णमूर्तींनी आपलं सारं जीवन ह्याविषयी बोलण्यातच खर्च केलं होतं आणि निदान काही लोकांना तरी हे समजू शकेल असं त्यांना वाटत होतं. 'मी'-'अहं' ह्याविषयी दुसरं काही शिकण्याची गरजच नव्हती, काही वाचायचीही गरज नव्हती, कुणाला काही विचारायची आणि कुठे जायचीही गरज नव्हती- फक्त अंतरंगात डोकावून मूकपणे पुढे सरकत राहणं अपेक्षित होतं.

***

कृष्णमूर्तींचं वसंत विहारमधील शेवटचं भाषण ४ जानेवारी १९८६ रोजी झालं. ह्या भाषणाचा समारोप करताना ते मृत्यू आणि निर्मिती ह्याविषयी बोलले. साठ वर्षांहून अधिक काळ त्यांनी लोकांना प्रचंड ऊर्जा दिली होती पण आता त्या ऊर्जेचा भर ओसरत चालला होता, तरीही त्यांचं तेज कायम होतं. ते मद्रासहून कॅलिफोर्नियाला जाण्यासाठी विमानात बसले तेव्हा त्यांचं शरीर क्षीण झालं होतं आणि वरचेवर त्यांना थोडा तापही येत होता. मी त्यांना लॉस एंजेलीस विमानतळावर भेटलो. ते व्हीलचेअरमध्ये बसून आले आणि म्हणाले, 'मला क्षमा करा. ठरलेल्या वेळेपेक्षा आधी येऊन मी तुम्हाला खरोखरच तसदी दिली आहे.' त्यांचं बोलणे ऐकून मी सद्गदित झालो. असा हा अदबशील आणि सहृदय पाहुणा घरी परतून आला होता.

पाईन कॉटेज मधल्या संत्र्यांच्या बागेमधल्या मिरीच्या वृक्षाजवळच्या त्यांच्या छोट्याशा घरात त्यांनी पुढचे सहा आठवडे काढले. हळूहळू त्यांचं शरीर अधिकाधिक क्षीण होत गेलं. पॅन्क्रीयाटिक कॅन्सरमुळे त्यांना बऱ्याच यातना सहन कराव्या लागत होत्या. त्यांचा भारत, इंग्लंड आणि कॅनडा मधला मित्रपरिवार त्यांची अखेरची भेट घेण्यासाठी आला - सर्वांनी एकदिलाने काम करावे ही विनंती पुन्हा एकदा त्यांच्या तोंडून ऐकण्यासाठी, 'फाउंडेशनमध्ये एकात्मता असूदे' आणि 'पूर्णतया सजग रहा आणि आयासप्रयास करू नका', ही त्यांची कळकळीची विनंती कायम लक्षात ठेवण्यासाठी'.

गेल्या दहा वर्षांपासून कृष्णमूर्ती आम्हाला सतत विचारत होते, 'मी आता असणार नाही, तुम्ही काय करणार आहात? - आम्हाला पुढच्या संभाव्य घटनांची जाणीव करून देण्यासाठीच ते वारंवार हा प्रश्न आमच्यापुढे ठेवत होते.

मला जेव्हा ह्या प्रश्नांचं गांभीर्य कळलं आणि कृष्णजींना अभिप्रेत असलेला अर्थ उमगला तेव्हा कृष्णमूर्ती शोक आणि खेद यांसारख्या रूढ प्रतिक्रियांबद्दल बोलत नसून कृतीबद्दल बोलत आहेत हे कळलं, आणि मग १७ फेब्रुवारी १९८६चा दिवस (कृष्णमूर्तींचं निधन) उलटल्यानंतरच्या प्रहरांमध्ये माझ्याकडून चिंतनशील प्रतिसाद येऊ लागला.

कृष्णमूर्ती ही व्यक्ती, हे विलक्षण व्यक्तिमत्त्व आता कालौघात विलीन झालं होतं. त्यांच्या शिकवणीनुसारच ते जगले. ही व्यक्ती आणि तिची शिकवण ह्यामध्ये संगति होती - सुसूत्रता होती. ते म्हणत, 'शिकवण नाहीच आहे - आहे ते फक्त जीवन'. परंतु, खरं तर त्यांच्या जीवनाचा आणि शिकवणीचा गंध आजही दरवळत आहे. त्यांनी अतिशय विचारपूर्वक, खूप कष्ट घेऊन शिकवणीचा वेध घेतला आणि नंतर ही शिकवण जाणून घेण्यासाठी उत्सुक असलेल्या प्रत्येक व्यक्तीला तिचा लाभ दिला. त्यांचं 'असणं' हा अगणित श्रोते आणि वाचक यांच्यासाठी मोठा आधार होता, मात्र त्यांनी तसा प्रयत्न कधी केला नाही. कारण यश, प्रशंसा मिळवणं हा त्यांचा हेतू नव्हताच. 'त्यांचं' असणंच पुरेसं होतं आणि त्याचा प्रत्यय अजूनही येत आहे.

World Teacher -
The Life and Teachings of J. Krishnamurti

सध्याची अनिश्चित परिस्थिती लक्षात घेता सह्याद्री अध्ययन केंद्र येथे नोव्हेंबर २०२० मध्ये आयोजित करण्यात आलेले यंदाचे KFI चे वार्षिक संमेलन बहुधा होऊ शकणार नाही. आगामी कार्यक्रम, प्रकाशने इ. बद्दलची सर्व माहिती फाउंडेशनच्या अधिकृत संकेतस्थळावर (www.kfionline.org) वेळोवेळी उपलब्ध करण्यात येईल.

कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, वसंतविहार, १२४, १२६, ग्रीनवेज रोड, चेन्नई - ६०० ०२८.
दूरध्वनी : ०४४०-२४९३७८०३/२४९३७५९६ • ईमेल : info@kfionline.org • वेबसाईट : www.kfionline.org

कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, बेंगलुरू : संपर्क: द स्टडी, व्हॅली स्कूल कँपस, १७ कि.मी. कनकपुरा रोड, थातगुणी पोस्ट, बेंगलुरू-५६००६२.
दूरध्वनी : ०८० - २८४३५२४३ • ईमेल : kfistudy@gmail.com • वेबसाईट : www.kfistudy.org

कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, राजघाट- वाराणसी: कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, राजघाट फोर्ट, वाराणसी २२१ ००१.
दूरध्वनी: ०५४२ - २४४१२८९ / २४४०३२६ • ईमेल : studycentre@rajghatbesantschool.org • वेबसाईट : www.rajghatbesantschool.org

कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, सह्याद्री: पोस्ट - तिवई हिल, तालुका खेड (राजगुरुनगर), जिल्हा - पुणे, पिन - ४१०५१३, महाराष्ट्र
दूरध्वनी : (०२१३५) २८८७७२, २८८३४८, २०३४७५ • ईमेल : kfisahyadri.study@gmail.com • वेबसाईट : http://www.kscskfi.com

कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, ऋषी व्हॅली: जिल्हा चित्तूर, आंध्र प्रदेश - ५१७३५२ दूरध्वनी : : (०८५७१) २८०६२२/ २८०५८२, ९४९३५४७८२२/ ९४९३५४७३२२/७८९३६४४७१७/७८९३६४४४९७ • ईमेल : study@rishivalley.org • वेबसाईट : http://www.rishivalley.org

कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, उत्तरकाशी: पोस्ट रानारी, डुंडा ब्लॉक, जिल्हा उत्तरकाशी - २४९१५१. • ईमेल : krc.himalay@gmail.com
दूरध्वनी : ९४१२४ ३६४२९/९४१५९८३६९० • वेबसाईट : http://www.jkrishnamurtionline.org भारतीय भाषांमधील संकेतस्थळ

कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, कोलकाता: कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, ३०, देवदार स्ट्रीट, कोलकाता - ७०००१९.
दूरध्वनी : (०३३) ४००८२३९८ • ईमेल : kfikolkata@gmail.com

कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, कटक: ओरिसा, पुरीघाट रोड, तेलेंगा बझार, कटक - ७५३००९, ओरिसा.
दूरध्वनी : (०६७१) ६४१७९९० • ईमेल : kficuttackcentre@gmail.com • वेबसाईट : www.kficc.org

कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, बदलापूर: आनंद-विहार, जे. कृष्णमूर्ती सेल्फ एज्युकेशन सोसायटी, जांभिळघर, राहाटोली गावाजवळ, बदलापूर (प.), ता. ठाणे, पिनकोड- ४२१५०३. दूरध्वनी : (०२२) २६६००२२४, २४२२३१९९ • ई मेल : jksesbadlapur@gmail.com • वेबसाईट : www.jkses.org

वार्षिक संमेलन २०१९ : स्वत्व-ओळख, हिंसा आणि जाणीवेतील आमूलाग्र बदल

२०१९ च्या नोव्हेंबर महिन्यात ऋषी व्हॅली येथे कृष्णमूर्ती फाउंडेशनचे वार्षिक संमेलन झाले. 'स्वत्व किंवा ओळख, हिंसा आणि जाणीवेतील आमूलाग्र बदल' हे ह्या तीन दिवसांच्या कार्यक्रमाचे विषयसूत्र होते. प्रोफेसर सॅमडाँग रिम्पोचे, डॉक्टर शैलेश शिराळी, प्रोफेसर पी. कृष्णा आणि इतर काही वक्त्यांनी या तीन मुख्य विषयांवर सुमारे अडीचशे श्रोत्यांच्या उपस्थितीत त्यांचे चिंतन मांडले आणि त्या अनुषंगाने कृष्णमूर्तींच्या सखोल विचारांचा धांडोळा घेतला.

सध्याचे जग अतिशय दुभंगलेले आणि हिंसात्मक आहे. या पार्श्वभूमीवर, स्वत्व-ओळख, हिंसा आणि जाणीवेतील आमूलाग्र बदल या विषयांच्या अनेक छटा आणि बाजू दाखवणारे आणि भेदक, मर्मग्राही व भावी काळाचा वेध घेणारे कृष्णमूर्तींच्या भाषणांचे व्हिडिओ पाहून त्यावर चर्चा करणे हा या कार्यक्रमाचा महत्वाचा भाग होता.

प्रोफेसर सॅमडाँग रिम्पोचे हे त्यांच्या उद्घाटनाच्या भाषणात म्हणाले की हिंसा ही एके काळी फक्त राजे आणि त्यांच्या लढाया यापुरती मर्यादित होती. आता मात्र हिंसेने संपूर्ण समाजजीवनाला वेढले असून त्या विषाणूने राजकीय व्यवस्था, आर्थिक व्यवस्था आणि या व्यवस्था चालवणाऱ्या संकल्पनांना अक्षरश: पोखरले आहे आणि त्यामुळे संपूर्ण समाज हिंसेच्या विळख्यात सापडला आहे.

रिम्पोचेजी म्हणाले की हिंसा ही आता इतकी नियोजनबद्ध आणि सर्वव्यापक झाली आहे की प्रत्येक व्यक्तीने आपल्या आक्रमक आणि हिंसात्मक इच्छा-आकांक्षापासून मुक्ती मिळवलीच पाहिजे. ते म्हणाले की मुख्यत्वे करून संपूर्ण समाजजीवनातील या हिंसात्मक ताण्याबाण्यांचा गुंता आपण सगळ्यांनी सोडवायला हवा, त्यामुळेच समाजाचे हिंसात्मक स्वरूप बदलू शकेल.

डॉक्टर शिराळी यांनी विसाव्या आणि एकविसाव्या शतकातील भयंकर हिंसेचा आढावा घेऊन त्याबद्दल त्यांना काय वाटते ते स्पष्ट केले. पर्यावरणाचा हिंसात्मक विनाश तसेच विविध देशांनी किंवा राजकीय व्यवस्थांनी घडवून आणलेला नरसंहार या सगळ्यात मोठ्या हिंसा असल्या तरी आता हिंसांचे नवे प्रकारही दिसून येतात असे सांगून ह्या बाबतीत त्यांनी सायबर गुंडगिरी, आंतरजालावरील समाजमाध्यमांमधून हेतूपूर्वक केले जाणारे प्रक्षोभक लिखाण इत्यादी गोष्टींची उदाहरणे दिली.

डॉक्टर शिराळी म्हणाले की असा समज असतो की स्वत्व किंवा ओळख ही स्थिर असते - ती कधी बदलत नाही. वास्तविक पाहता, अनेक प्रकारच्या ओळखी किंवा स्वत्वाच्या कल्पना या वेगवेगळ्या ओळखी किंवा स्वत्वाच्या वैविध्यातून आकारास येतात हे आपल्याला कृष्णामूर्तींनी उलगडून दाखवले आहे. ते म्हणाले की वेळोवेळी निर्माण होणाऱ्या अनेकविध इच्छा-आकांक्षा आणि कल्पना यांचा एकच स्रोत आहे. तो म्हणजे आपली मुख्य ओळख आणि तिला चिकटून बसलेले आपले मन - ज्यातून पुढे फक्त हिंसा निर्माण होते. आपण हे समजून घ्यायला हवे. हेही लक्षात घ्यायला हवे की आपण ओळख निर्माण करण्याच्या प्रक्रियेकडे आणि त्यातून निर्माण होणाऱ्या अनेकविध ओळखींकडे एकाचवेळी समग्रतेने बघूही शकतो.

प्राध्यापक कृष्णा म्हणाले की ओळख किंवा स्वत्वाच्या संकल्पना या नैसर्गिक प्रक्रियेचा भाग आहेत, ज्या आपल्या सहजप्रवृत्तीने आकारास येतात. त्याला त्यांनी 'दैनंदिन जीवनातील कार्यासंबंधित ओळख' असे संबोधले. मात्र ही ओळख जेव्हा संकल्पना आणि वस्तूंशी जोडली जाते तेव्हा ती व्यक्तीपासून दूर जाते आणि त्याचवेळी समग्र आणि संपूर्ण जबाबदारीची जाणीवही नाहीशी होते, असेही ते म्हणाले.

तीन दिवसांच्या या कार्यक्रमाचा आढावा घेताना श्रीमती मीनाक्षी थापन यांनी स्वत्व-ओळख आणि हिंसा यांचे शास्त्रशुद्ध आणि पांडित्यपूर्ण विश्लेषण केले. जाणीवेच्या आमूलाग्र बदलाचा त्यांनी शिक्षणक्षेत्राच्या दृष्टीकोनातून उहापोह केला. त्या हेही म्हणाल्या की या क्षेत्रात एका देशाशी 'निष्ठा आणि देशभक्ती' हे अनुस्यूत असते आणि ती अभ्यासक्रमाशी निगडित असते.

संमेलनाची सांगता करताना त्यांनी एक नेमका आणि भेदक प्रश्न विचारला की सद्यकालीन समाजात जे सगळे घडत आहे ते आपण लहान मुले, शाळा, शिक्षण आणि जाणीवेतील आमूलाग्र बदल यांच्या विषयीच्या संवादातून वेगळ्या रितीने समजून घेऊ शकू का?

राजघाट, वाराणसी येथील प्रदर्शन



वसंत विहार, चेन्नई

एक अनुभवात्मक प्रदर्शन

गुंतागुंतीच्या, हिंस्र, असंख्य समस्या असणाऱ्या आपल्या जगात प्रेमाने, शांततेत, स्वतंत्रपणे जगावे कसे याची शिकवणूक देणारे जागतिक कीर्तीचे तत्वज्ञ, तसेच अपार करुणा आणि विलक्षण प्रज्ञा असणारे आगळे वेगळे शिक्षक जे. कृष्णमूर्ती यांची एकशेपंचविसावी जयंती कृष्णमूर्ती फाउंडेशन २०१९-२०२० हे संपूर्ण वर्ष साजरी करत आहे. जे. कृष्णमूर्तींचा जन्म ११ मे १८९५ रोजी झाला आणि १७ फेब्रुवारी १९८६ रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या १२५व्या जयंतीच्या निमित्ताने कृष्णमूर्तींचे तत्वज्ञान आणि शिकवणूक यावर प्रदर्शने आयोजित करण्यात येत आहेत. त्या निमित्ताने ज्यांना कृष्णमूर्ती आणि त्यांच्या शिकवणुकीची माहिती नसेल अशा नवीन पिढीतील लोकांपर्यंत पोहोचण्याचा फाउंडेशनचा मानस आहे.

सत्याची जाणीव ही कालातीत असून ती मनाच्या जागरुकतेत होते हा कृष्णमूर्तींच्या जीवनदृष्टीचा मूळ गाभा. त्या अनुषंगाने 'पहिले पाऊल हेच चिरंतन सत्याकडे नेणारे अंतिम पाऊल आहे' या कृष्णमूर्तींच्या मध्यवर्ती संकल्पनेवर आधारित दृक्-श्राव्य प्रदर्शन आयोजित करण्यात आले.

१ ते ८ फेब्रुवारी या आठवड्यात वृक्षराजीने बहरलेला चेन्नई येथील वसंत विहारचा परिसर कृष्णमूर्तींच्या सद्यकालीन आणि तरीही कालातीत असलेल्या शिकवणुकीचा परिचय करून देण्यासाठी सज्ज झाला होता.

कृष्णमूर्ती फाउंडेशनचा प्रवेश मार्ग, तेथील हिरवळ, बगीचे, हॉल, दोन्ही जिने, बाल्कनी, अभ्यासिका, व्हरांडे सगळे प्रदर्शनाचा अविभाज्य भाग होते. कृष्णमूर्तींचा संक्षिप्त जीवनपट तिथे चित्ररूपाने उभा केला होता. विविध प्रवचनांमधून संकलित केलेल्या शिकवणुकी कृष्णमूर्तींच्या धीरगंभीर, नादमय आवाजात बदामाच्या वृक्षावरून काही वेळा कानावर पडत होत्या.

व्हॅली स्कूल, बंगळुरु

कृष्णमूर्तींनी नातेसंबंध, हिंसा, भीती, प्रेम, मृत्यू, निसर्ग, शिक्षण आणि धर्म यावर मूलगामी प्रबोधन केले. मानवी आयुष्याशी निगडित असणारे हे विषय आणि त्याविषयीच्या सगळ्या समस्या यावरील त्यांचे चिंतन, विचार; अत्यंत तात्विक आणि मूलगामी उकल करत निखळ सत्यापर्यंत नेणाऱ्या त्यांच्या शिकवणुकीचे विविध पैलू अतिशय संवेदनशीलपणे आणि कलात्मकरित्या वेगवेगळ्या दालनांमधून विषयवार हाताळले होते.

बागेतील एका वृक्षाखाली कल्पकतेने एका अभ्यासिकेची मांडणी केली होती. तिथे पुस्तकवाचनाची तसेच हेडफोन्सद्वारे कृष्णमूर्तींची व्याख्याने, त्यांचे संवाद ऐकण्याची व्यवस्था केली होती. एकंदरीतच हा एक आगळावेगळा अनुभव होता.

हे असेच प्रदर्शन वाराणसी येथील राजघाट बेझंट स्कूल तसेच बंगरुळु येथील व्हॅली स्कूल येथेही भरवण्यात आले.

२ फेब्रुवारी रोजी वसंत विहार येथे फाउंडेशनचे सेक्रेटरी श्री. कंदास्वामी यांचे 'कृष्णमूर्तींच्या शिकवणुकीबरोबरच माझा प्रवास' ह्या विषयावर व्याख्यान झाले.

वसंत विहार, चेन्नई



आपल्या आवडीचा व्यवसाय शोधणे - एक संवाद

२९ फेब्रुवारी २०२० रोजी फादर लॅन्सी प्रभू यांचा सायन येथील एस्.आय.इ.एस्. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांबरोबर 'आपल्या आवडीचा व्यवसाय शोधणे' या विषयावर संवाद झाला.

फादर प्रभूंनी सुरुवात करताना कृष्णमूर्तींच्या जीवनाचा थोडक्यात परिचय करून दिला आणि त्यांच्या शिकवणुकीची ओळख करून दिली. ते म्हणाले की कृष्णमूर्ती हे गेल्या शतकातील एकूण मानवजातीच्या जाणीवेवर प्रभाव टाकणारे एक अद्वितीय जीवनभाष्यकार होऊन गेले.

जगातील सामाजिक परिस्थितीसंबंधी बोलताना ते म्हणाले की, समाजामध्ये बाह्य बदल घडवून आणणे व्यर्थ आहे कारण आपल्या अंतर्मनाच्या सध्याच्या अवस्थेमध्ये वरवरच्या बदलाने केवळ तोच तो चंगळवादी समाज निर्माण होतो. त्यांनी असे निदर्शनास आणून दिले की सध्याची शिक्षण पद्धती, त्यामधील माहिती गोळा करण्याची पद्धत, परीक्षा पद्धती, स्पर्धा हे सर्व आपल्या समाजातील विविध उद्योगधंद्यांना त्यांच्या सोयीनुसार तरुण पिढीतील माणसं पुरविणारे कारखाने झाले आहेत.

फादर प्रभूंनी विद्यार्थ्यांना सांगितले की कृष्णमूर्तींना माणसामधील सुप्त गुण, सुप्त क्षमता कशा प्रकट होतील, खुलतील, यासंबंधी आस्था होती. योग्य व्यवसाय शोधणे हे आनंदी जीवन जगण्यासाठी कसे आवश्यक आहे हे सांगताना शिक्षणाच्या उच्चतम गुणवत्तेला सुद्धा कृष्णमूर्तींनी तेवढेच महत्व दिले आहे. परंतु ते शिक्षण तुलना किंवा स्पर्धा ह्या माध्यमातून नव्हे, भ्रष्ट समाजाच्या चौकटीत बसण्यास पात्र ठरण्यासाठी नव्हे.

फादर प्रभू पुढे म्हणाले की, कृष्णमूर्ती कुठच्याही पंथाला किंवा धर्माला संलग्न नव्हते, तसेच कुठचेही राष्ट्रीयत्व मानत नव्हते आणि कुठल्याही विचारप्रणालीशी त्यांची बांधिलकी नव्हती. एवढेच नव्हे तर कृष्णमूर्तींची अशी धारणा होती की ही बांधिलकीच तुमच्यामधील भेदाभेद आणि संघर्ष निर्माण करते. आपण सर्वसाधारण सामान्य माणसे आहोत, जगातल्या इतर सर्व माणसांसारखे, ज्यांना राग, चिंता, दु:ख, आनंदाचे अनुभव येत असतात. सर्व मानवजातीला हेच अनुभवावे लागते. आपण एक व्यक्ती (individual) म्हणून जगत असतो - individual ह्या शब्दाच्या मूळ अर्थाप्रमाणे अभेद्य, अविभाज्य असतो, एकसंघ असतो. इतर व्यक्तीपेक्षा मूलत: वेगळे नसतो.

कृष्णमूर्तींच्या मूलभूत परिवर्तनासंबंधी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना फादर प्रभूंनी शब्दाचा आवाका कसा मर्यादित असतो हे समजावून सांगितले. त्यांनी पुढे असे निदर्शनास आणून दिले की एखाद्या वस्तूचे वर्णन म्हणजे ती वस्तू नव्हे. ते म्हणाले की कृष्णमूर्तींना मानवाच्या संस्कारबद्धतेच्या मर्यादांची जाणीव होती परंतु आपल्याला बहुतांशी आपल्या संस्कारबद्धतेच्या मर्यादांची जाणीव नसते. आपली संस्कारबद्धता आपल्याला आपला असा एक वेगळा 'अहं' आहे, आपण एक निराळी व्यक्ती आहोत असे भासवीत असते, स्वतंत्र व्यक्तिमत्वाची भावना निर्माण करत असते, जी अखेर संघर्षामध्ये रूपांतरित होते. परंतु कृष्णमूर्तींनी असे म्हटले आहे की प्रत्येक माणसामध्ये मूलभूत परिवर्तन घडून येण्याची सुप्त क्षमता असते.

फादर प्रभू पुढे म्हणाले की सर्वसाधारणपणे बाह्य कारणांवरून तुम्ही तुमचा व्यवसाय निवडत असता - उदा. पैसा, प्रतिष्ठा वगैरे. त्यामुळे स्पर्धेला सामोरे जावे लागते, जी विनाशकारी असते. ती

निराशा आणते आणि मग इतर सर्व ताणतणाव येत असतात. कृष्णमूर्ती विद्यार्थ्यांशी संवाद करताना कुठचीही गोष्ट शिकण्याची खरीखुरी आवड असण्याबद्दल बोलत असत. जेव्हा तुम्ही तुमच्या आवडीचे काही काम करण्यामध्ये गुंतलेले असता, तेव्हा तुम्हाला वेळेचे भान नसते. ते काम करण्यामागचे समाधान असते. ते समाधान त्या कामातील अंगभूत, स्वाभाविक मूल्यासाठी, आनंदासाठी असते आणि कोणत्याही बाह्य कारणासाठी नसते. तेथे उत्स्फूर्ततेचा आणि निर्मितीचा आनंद असतो, तेथे अहंपणाची भावना अजिबात नसते. तुम्ही तुमच्या कार्यामध्ये उंच शिखरे गाठू शकता. तुमच्याजवळ विलक्षण ऊर्जा असते. मग कोणत्या व्यवसायाकडे तुमचा स्वाभाविक कल आहे, ह्याची तुम्हाला जाणीव होण्याची शक्यता असते. तुमची क्षमता स्वाभाविकपणे उमलते.

फादर प्रभूंनी पुन्हा स्पष्ट केले की जर एखाद्या गोष्टीबद्दल तळमळ असेल तर ती तळमळच ऊर्जा निर्माण करते. तुम्ही कुठच्याही प्रकारचे कष्ट करण्यास तयार होता. कृष्णमूर्ती असे म्हणाले आहेत की आपल्या विशेष आवडीचे कार्य कोणते आहे ह्याचा जेव्हा तुम्हाला शोध लागतो, तेव्हा तुम्ही या जगात कोणत्याही संघर्षाशिवाय जगता.

फादर प्रभू म्हणाले की फारच थोड्या लोकांना त्यांच्या जीवनात याचा शोध घेता आला आहे. त्यांच्या शिक्षणाचा मूळ हेतू आर्थिक सुरक्षितता मिळविण्याकडे असतो. पालकसुद्धा याच दृष्टिकोनातून त्याकडे पाहतात. फादर प्रभूंनी विद्यार्थ्यांना आवर्जून सांगितले की त्यांनी एका महत्त्वाच्या बाबीची कसून तपासणी केली पाहिजे, ती म्हणजे - आपल्याला एखादी गोष्ट करण्यात विशेष रस वाटण्याच्या मुळाशी खरोखर काय असते: तो सामाजिक प्रभावाचा परिपाक असतो का, की एकंदर परिस्थितीमुळे आपली तशी प्रवृत्ती होते, की त्यामागे आपला स्वार्थ असतो, किंवा मग आपला जो नैसर्गिक कल असतो त्यातून ही आवड उत्पन्न होते. ह्या मनोव्यापाराबद्दल जागरूक असणे अत्यंत जरुरीचे आहे.

फादर प्रभूंनी पुढे असे निदर्शनास आणून दिले की, तुम्ही जेव्हा आर्थिक सुरक्षिततेच्या विचाराने पूर्णपणे झपाटलेले असता, तेव्हा कदाचित तुम्हाला न आवडणारे काम करण्याची तुमच्यावर सक्ती होऊ शकते आणि मग तुम्ही सामान्य दर्जाची व्यक्ती बनता. तुम्ही ऐहिक फायदे देणाऱ्या गोष्टी - पैसा, इस्टेट, प्रतिष्ठा, सत्ता, प्रसिद्धी यांच्या मोहाला बळी पडता आणि नंतर कोणीतरी विशेष बनण्याच्या ध्यासामध्ये अडकता. यश मिळविण्याच्या आपल्या संस्कारांमुळे मानसिकदृष्ट्या दुर्बळ माणसे निर्माण होतात. त्यांनी आवर्जून सांगितले की यशाची व्याख्या नव्याने करणे आता आवश्यक झाले आहे.

पालकांच्या अपेक्षा फार उंचावल्या आहेत. खरे तर, पालकांनी त्यांच्या पाल्याला त्याचा किंवा तिचा कल बघून, आपला व्यवसाय निवडण्यामध्ये मित्राप्रमाणे मदत केली पाहिजे. फादर प्रभूंनी विद्यार्थ्यांना सावध राहण्यास सांगितले की कदाचित आर्थिकदृष्ट्या लाभदायक व्यवसाय निवडण्यासाठी त्यांचे पालक त्यांच्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न करतील. ते म्हणाले की अशा परिस्थितीत त्यांनी जर त्याहून निराळा, स्वत:ला आवडणारा व्यवसाय निवडला तर कदाचित पालक त्यांना देत असलेली आर्थिक मदत बंदही करतील. पण आपण जर न घाबरता, पालकांशी संवाद साधण्याचा प्रयत्न करून अनाठायी दबावाला शरण गेलो नाही तर जीवन आपल्याला मदतीचा हात पुढे करते. स्वत:च्या आंतरिक प्रेरणेप्रमाणे जगण्यासाठी कोणत्याही परिणामाला तोंड देण्याची आपली तयारी असली पाहिजे.

फादर प्रभूंनी 'वनस्पतीशास्त्रातील क्रीडा' ('Sport in plants') ह्या संज्ञेचे उदाहरण दिले. क्वचित एखाद्या झाडावर त्या मूळ झाडाहून पूर्णपणे भिन्न असे एक अगदी आगळेवेगळे रोपटे उगवते – ते उत्परिवर्तनाने निर्माण झालेले असते. बागेतील माळ्याच्या ते दृष्टीस पडते आणि मग तो काळजीपूर्वक त्या अनपेक्षित 'अपत्या'ची प्रेमाने जोपासना करतो. कृष्णमूर्ती म्हणतात की सत्य हे तुम्हाला अनपेक्षितपणे तुमचा खरा स्वधर्म काय आहे ते उघड करते आणि मग तुम्ही विलक्षण सृजनशील असे काम करू शकता. तुम्हाला जे करण्यात आनंद मिळेल तेच तुम्ही करता आणि इतर बाह्य आकर्षणांमध्ये अडकत नाही.

काही विद्यार्थ्यांना असे वाटत होते की कृष्णमूर्तींची ही महत्त्वाची शिकवण इतरांपर्यंत पोहोचली पाहिजे, जे विचारधन त्यांना गवसले आहे त्यात इतरांना सहभागी करून घेण्यामध्ये त्यांना आनंद होईल. फादर प्रभूंनी विद्यार्थ्यांना सांगितले की ह्यासाठी सर्वांत चांगला मार्ग म्हणजे आपण स्वत:च तसे जगणे. त्यांनी ही विचारधारा इतरांपर्यंत नेण्यासाठी व्हिडिओ दाखविणे, त्यावर एकत्र संवाद करणे, पुस्तकांची प्रदर्शने आयोजित करणे, असे काही पर्यायही सुचविले. परंतु ही गोष्टही ध्यानात ठेवण्यास सांगितले की कृष्णमूर्ती कोणत्याही प्रकारच्या प्रचाराविरूद्ध होते – कारण प्रचार ही एक प्रकारची हिंसात्मक कृतीच असते. आणि म्हणून हे कार्य अतिशय जबाबदारीने करणे आवश्यक आहे.

प्रौढ जीवनाच्या उंबरठ्यावर असलेल्या ह्या विद्यार्थ्यांच्या दृष्टीने हा विषय अतिशय महत्त्वाचा आहे. विद्यार्थी एकचित्ताने ह्या सत्रात सहभागी झाले आणि त्यांना ह्यातून एका आगळ्या जीवनदृष्टीची जाणीव झाली असावी असे वाटले.

---

२९ डिसेंबर २०१९: 'द इंटिग्रल स्पेस', लोअर परळ, येथे श्री. अभिजित पडते ह्यांच्या मार्गदर्शनाखाली एक चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. श्री. अभिजीतनी 'एकत्र विचार करणे' म्हणजे काय ह्याबद्दल थोडक्यात सांगितल्यानंतर उपस्थित सहभागींनी त्यावर अनेक प्रश्न विचारले. प्रश्नोत्तरांच्या ओघात सहभागींनी इच्छा, सुख व भीती ह्या गोष्टी जीवनामध्ये संघर्ष निर्माण करतात ह्या समस्येवर प्रश्न उभे केले. विचार हाच आपल्या जीवनामध्ये इच्छा, सुख व भीती निर्माण होण्याचे कारण कसे असतो, हे श्री. अभिजीतनी विषद करून सांगितले आणि आपण विचाराद्वारेच हे प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करीत असतो हा विरोधाभास निदर्शनास आणून दिला. आपल्याला विचाराशिवाय भीती, इच्छा इत्यादी समस्यांकडे पाहता येईल का, असा प्रश्न त्यांनी विचारला.

भूतकाळ आड न येता भीतीचे निरीक्षण करण्याबद्दल काहीजणांनी सुचवल्यावर श्री. अभिजीत म्हणाले की जर खरोखरच असे प्रत्यक्ष निरीक्षण झाले तर ते काल्पनिक नसेल, ती भूतकाळामधून आलेली प्रतिक्रिया नसेल, तर खरीखुरी कृती असेल. त्यावर काही सहभागींनी विचारले की विचारपूर्णपणे थांबविणे शक्य होईल का? किंवा कृष्णमूर्ती म्हणतात त्याप्रमाणे विचार स्थगित होऊ शकतो का? श्री. अभिजीत म्हणाले की अशा प्रकारची चर्चा ही सैद्धांतिक होईल. परंतु जर आपण विचाराची मर्यादा समजून घेतली तर आपण विचाराला त्याची योग्य जागा देऊ शकू.

सर्व सहभागींनी चर्चेमध्ये गंभीरपणे भाग घेतला होता.

२० जानेवारी २०२०: सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टस् ह्या कला महाविद्यालयातील MFA आणि BFA च्या विद्यार्थ्यांसाठी एक चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. तेथील एक माजी विद्यार्थी, श्री. नितीन कुलकर्णी, जे एक कलाअध्यापक, चित्रकार, लेखक आणि कवीदेखील आहेत, त्यांनी 'शिक्षण: जीवन रहस्य' (Education and the Significance of Life) ह्या पुस्तकातील 'कला, सौंदर्य आणि सर्जन' ह्या विषयावरील कृष्णमूर्तींच्या लिखाणावर विद्यार्थ्यांशी सखोल चर्चा केली. प्रत्येक मुद्द्याची त्यांनी बारकाईने तपासणी केली. कृष्णमूर्ती ज्याप्रमाणे सौंदर्य आणि सृजनशीलतेचा विचार करतात ते विद्यार्थ्यांसाठी अगदीच नवीन होते. बऱ्याच उहापोहानंतर, 'खरी सृजनशीलता म्हणजे काय, हे समजण्यासाठी प्रथम 'अहं' च्या जडणघडणीची उकल केली पाहिजे का?' असा प्रश्न विद्यार्थ्यांनी उपस्थित केला.

विद्यार्थ्यांनी अतिशय रस घेऊन श्री. कुलकर्णींना अनेक प्रश्न विचारले. पुढील संवादसत्रांमधून ह्या विषयाचा अधिक शोध घेण्यास हे विद्यार्थी उत्सुक आहेत.

१७ फेब्रुवारी २०२०: प्रसिद्ध दिग्दर्शक श्री. जी. अरविंदन ह्यांनी दिग्दर्शित केलेला 'The Seer Who Walks Alone' हा कृष्णमूर्तींवरील माहितीपट सायन येथील एस्.आय.इ.एस्. महाविद्यालयामधील तत्वज्ञान विभागातील विद्यार्थ्यांना दाखविण्यात आला. ह्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात कृष्णमूर्तींच्या शिकवणीचा अभ्यास समाविष्ट असल्यामुळे त्यांनी अतिशय कुतुहलाने हा माहितीपट पाहिला.

शिकवण्यातील आव्हाने – एक कार्यशाळा

३ मार्च २०२०: बॉम्बे टीचर्स ट्रेनिंग कॉलेज (BTTC), कुलाबा येथे चेन्नई येथील 'द स्कूल – KFI' ह्या शाळेमधील शिक्षक श्री. अरविंद रंगनाथन ह्यांच्या मार्गदर्शनाखाली बी.एड्. विद्यार्थ्यांसाठी एक कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. विषय होता, 'शिकवण्यातील आव्हाने (The Courage to Teach)'. श्री. अरविंद ह्यांनी ही कार्यशाळा विद्यार्थ्यांमधील परस्पर संवादाच्या पद्धतीने आयोजित केली होती आणि विद्यार्थ्यांनी त्यात मनापासून सहभाग घेतला. श्री. अरविंद ह्यांनी विद्यार्थ्यांना अनेक प्रश्न विचारले. आपण जर जाणीवपूर्वक स्वत:ला समजून घेण्याचा प्रयत्न करीत असलो तर त्यामुळे एक शिक्षक म्हणून,

एक माणूस म्हणून आपल्या समाजाशी असलेल्या संबंधांवर कसा परिणाम होत असतो हे त्यांनी दाखवून दिले. त्यांनी विद्यार्थ्यांना शिकविण्याच्या अशा पद्धतींचा शोध घ्यायला सांगितले ज्यामध्ये ह्या शैक्षणिक संस्था आपल्याला स्वत:ला समजून घ्यायला अधिक मदत करू शकतील आणि त्यामुळे चांगल्या शिक्षण पद्धतीचा पाया घातला जाईल.

विद्यार्थी गटांमधील प्रश्नोत्तरे होत असताना श्री. अरविंद ह्यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या विद्यार्थीदशेत त्यांनी अनुभवलेली भीती, चिंता, भूतकाळातील अनेक प्रभाव, काही वेळा करावी लागलेली प्रचंड धडपड, त्यांची स्वत:ची शिकवण्यातील काही बलस्थाने, त्यांचे आपल्या विद्यार्थ्यांबरोबरचे नातेसंबंध ह्या गोष्टींकडे पाहण्यास सांगितले. ह्या स्वत:विषयीच्या निरीक्षणपर संवादांमधून भीती, अनिश्चितता, एकटेपणा, एकमेकाबरोबरचे सहकार्य, मनाचा मोकळेपणा, संवेदनशीलता अशा अनेक भावना कशा सक्रीय होतात ह्याची विद्यार्थ्यांना जाणीव झाली.

आपल्या भूतकाळातील संस्कारांचे आपल्या दैनंदिन जीवनावर सतत परिणाम होत असतात, हे कृष्णमूर्तींचे विधान किती उचित आहे हे श्री. अरविंद ह्यांनी विद्यार्थ्यांना दाखवून दिले.

श्री. अरविंद ह्यांनी शिकविताना आवश्यक असलेल्या अवकाशा (space) विषयी विद्यार्थ्यांबरोबर चर्चा केली. तसेच त्यांनी निदर्शनास आणून दिले की हृदय व मेंदू, वस्तुस्थिती व भावना, सिद्धांत व प्रयोग, शिकवणे व शिकणे यांच्यामधील विरोधाभास आपण पाहिला पाहिजे. ह्या विरुद्ध गोष्टींमध्ये योग्य समतोल राखून निर्णय घेण्याचे महत्व त्यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

विद्यार्थ्यांनी गट करून त्यांच्या शिकण्याविषयीच्या अवकाशाच्या संकल्पना सादर केल्या. कार्यशाळा समाप्त होताना अनेक विद्यार्थ्यांनी ह्या कार्यशाळेतून आपल्याला चिंतन-मनन करण्यासाठी बरेच काही मिळाल्याची भावना प्रदर्शित केली.

विचारप्रक्रियेवर मुळीच अवलंबून नसलेली अंतर्दृष्टि

व्यक्तिगत पातळीवर अथवा जाहीर प्रश्नोत्तर-सभेमधे कृष्णमूर्तींशी चर्चा करताना मन अन्वेषी, चौकस, प्रश्न करण्यास तयार असणं अत्यावश्यक होतं. ते श्रोत्यांना शिकवणुकीवर प्रयोग करून पाहण्यास प्रोत्साहन देत; त्यांच्या म्हणण्यात तथ्य आहे वा नाही हे आपण स्वतः शोधून काढावं व शोधातून जे गवसेल त्याचं आव्हान त्यांच्यापुढे उभं करावं याकरता ते उत्तेजन देत. 'त्याच्या ठिकऱ्या उडवा', कृष्णमूर्ती म्हणत, 'ते सत्य आहे का याचा छडा लावा'.

१९६०च्या दशकात संवाद घडून येऊ लागले. कृष्णमूर्तींच्या दृष्टीने संवादांना महत्त्व होतं, ते आवर्जून सांगत, 'तुम्ही प्रश्न विचारले नाहीत तर आपण जिथल्या तिथेच अडून राहू. आणखी शिकवणूक येऊ घातली आहे.'

संवादांना जणू कलात्मकता लाभली: विवेचन न करता, कोणताही ठराविक दृष्टिकोन न बाळगता सावकाश प्रश्न मांडत जाणं, गरज भासल्यास त्यांकडे पुन्हा वळणं. काहीसं टेनिसच्या सामन्याप्रमाणे म्हणता येईल, मात्र प्रश्नाचा चेंडू इथे सर्व अन्वेषणकर्त्यांमधे तरंगत असे, चहुबाजूंनी निरखला जात असे. गुण मिळवण्याकरता स्पर्धा, वादविवाद करण्याऐवजी संवादांत लक्षपूर्वक, आपुलकीने विषय जिवंत, चलित राखला जाई. सहभागी व्यक्तींच्या श्रवण गुणाला इथं नितातं महत्त्व होतं: पूर्वग्रह न बाळगता, मानसिक चुळबुळ न करता ऐकणं.

ज्यांना आपल्या जगण्याबद्दल, जीवनपद्धतीबद्दल, भवतालच्या जगाबद्दल आस्था आहे, ज्यांना स्वतःच्या समस्या सोडवण्याबाबत कळकळ आहे अशा दोन व्यक्तींमधील संभाषण म्हणजे संवाद. अशा व्यक्ती संवादातून एकत्रितपणे अन्वेषण करतात.

सहज संपर्क साधणं, गप्पाटप्पा करणं, वादविवाद, चर्चा करणं किती सोपं असतं! खरोखर गहन संभाषण करणं किती कठीण असतं! संवाद साधताना आपण स्वतःकडे, आपल्या विचारांकडे, भावनांकडे पहातो. प्रत्यक्षात आपण अखिल मानवजात आहोत, तेव्हा स्वतःबाबत जाणून घेण्याजोगं असणार तरी काय! मी स्वतःचं निरीक्षण करू शकतो, स्वतःबाबत विचार करून मी स्वतःला जाणून घेऊ शकत नाही. आपल्या नातेसबंधांमधून, आपल्याच विचारांत डोकावल्यावर मला जे दिसतं त्यातून मला स्वतःची ओळख होते; मी बोलत असताना जे माझ्या कानी पडतं त्यातून मला स्वतःसंबंधी तत्काळ, वास्तवदर्शी अंतर्दर्शन घडतं. (सानेन, २५ जुलै १९७९, जाहीर चर्चा)

संवाद साधताना आपण कृष्णमूर्तींचे उद्गार पारखू शकतो, आपल्या विचारांच्या, भावनांच्या, नातेसंबंधांच्या प्रकाशात त्यांच्या शब्दांची चिकित्सा करू शकतो. अवलोकनाची ध्यानमूलक प्रक्रिया आहे ती - आपल्या भावना, विचार बदलण्याचा, त्यांपासून पळ काढण्याचा प्रयास न करणं. आपल्याला ज्यांमधे रस असेल त्या विषयांची आपण सौहार्दाने शोधयात्रा करू शकतो, त्यांचा उहापोह करू शकतो. तर्काच्या, बुद्धिप्रामाण्याच्या सहाय्याने विषयप्रवेश होतो, त्यायोगे आपण तर्कबुद्धीपलीकडे जाऊ लागतो. विचारप्रक्रियेवर मुळीच अवलंबून नसलेली अंतर्दृष्टि मग कदाचित लाभते. आपण आपलं अवधान बाहेरून आतल्या दिशेला वळवतो - समोरच्या व्यक्ती जे बोलतात त्यावर प्रतिक्रिया देण्याऐवजी आपल्यावर त्या बोलण्याचा जो परिणाम होतो, आपल्यात जे जे आढळतं त्याबद्दल मग सजगता येते. मन उनाड, बेताल असल्याचं संवादाच्या ध्यानमूलक प्रक्रियेतून आपण अगदी आत्मीयतेने पाहू शकतो. अंदाधुंदीकडे पहाणं, अंदाधुंदीपासून दूर जाण्याची धडपड न करणं यातून तिच्यामधे बदल घडून येऊ लागतो.

World Teacher -
The Life and Teachings of J. Krishnamurti

श्रीमती सिलू बिलिमोरिया, कृष्णमूर्ती फाउंडेशनच्या मुंबई केंद्राच्या माजी सचिव आणि कृष्णमूर्तींच्या जीवनदृष्टीच्या चिंतनशील अभ्यासक, ह्यांचं १४ सप्टेंबर, २०१९ रोजी मुंबईमध्ये वयाच्या ९७व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झालं.

कृष्णमूर्तींची शिकवणूक इतरांपर्यंत पोचवण्यासाठी त्या सतत कार्यरत असत. मुंबई केंद्राच्या कार्यक्रमांमध्ये त्यांचा सक्रीय सहभाग असे. कृष्णमूर्ती फाउंडेशनच्या जगभरातील सर्व केंद्रांमधून होत असणाऱ्या कार्याबद्दल त्यांना अतिशय आस्था होती.

'बालआनंद'साठी सिलूबेननी केलेलं योगदान अविस्मरणीय आहे. तिथे येणाऱ्या मुलामुलींचं इंग्रजी भाषेचं आकलन सुधारण्यासाठी सिलूबेननी वर्षानुवर्षं कमालीचे परिश्रम घेतले. आजही 'बालआनंद'चे अनेक माजी विद्यार्थी त्यांचं कृतज्ञतेने स्मरण करतात.

श्रीमती सिलूबेनना 'अंतरलहरी'ची भावपूर्ण आदरांजली.

स्वतःशी व वक्त्याशी समन्वय साधणं

संवादाची समस्या हा नेहेमी कठीण पेच ठरतो. आपापसांत गहन विषयांवर संलाप (commune) करताना मला वाटतं त्यात अवधानभाव असणं गरजेचं आहे. कारण समोरच्याला एखादी गोष्ट सांगताना आपल्यापैकी बहुतेकजण स्वतःच गोंधळेलेले असतात. समोरच्या व्यक्तीचंदेखील लक्ष नसतं, ती ऐकत नसते - ती आपल्याच चिंता, आशंका, भित्यांमधे बुडालेली असते. मग संवाद अत्यंत दुष्कर होऊन बसतो, संवादामुळे भयंकर दमछाक होते.

अशा पद्धतीच्या संवादात सहभागी होताना आपण दोघांनीही - वक्ता आणि तुम्ही ऐकणारी मंडळी - सहमेलनात असावं, आपल्याला एकमेकांशी समन्वय साधता यावा. याचाच अर्थ, आपण दोघांनीही तीक्ष्ण अवधानाच्या अवस्थेत असायला हवं, एकाच वेळी, एकाच स्तरावर असायला हवं. समपातळीवर असण्यासाठी तुमचं संपूर्ण लक्ष एकवटायला हवं. वक्त्याला काही सांगावंसं वाटलं तर; तो सांगणार आहेच, त्याकरता अंतर्दृष्टी लागते - शाब्दिक स्वीकृती, अस्वीकृती नव्हे, तर अंतर्दृष्टी - अवघ्या समस्येबद्दलची सखोल, सुगाढ अंतर्दृष्टी - तुमची आणि वक्त्याची भेट व्हायला हवी; एकाच वेळी. सारख्याच पातळीवर, सारख्याच उत्कटतेने तुम्ही एकमेकांशी मेळ साधावा. नाहीतर संगति साधली जात नाही, संवाद घडत नाही. तुम्ही शब्द ऐकाल आणि आपल्या लहरीनुसार, आपल्या विशिष्ट भाषिक समजेनुसार त्यांचा अर्थ लावाल. मग संवाद होऊ शकत नाही.

तुम्ही कधी स्वतःशी संलाप साधला आहे का, संगति साधली आहे का ते मला माहित नाही - ध्यानधारणा नव्हे, केवळ संगतीत असणं, संवाद साधणं, स्वतःच्या संपर्कात असणं. तुम्ही कधी आपल्या मनाशी, हृदयाशी मेळ साधला असेल तर त्याकरता किती अवधानाची गरज असते ते तुम्हाला ठावूक असेल. तुम्हाला चटकन समजून घ्यावं लागतं. शब्दाचा अर्थ, त्याचप्रमाणे शब्दातीत सार्थतासुद्धा त्वरेने दिसावी लागते. शब्दांचा अर्थ, स्वरूप व मर्म जेव्हा दोघांनाही उमजून येतं तेव्हाच संलाप अथवा संवाद साधला जाऊ शकतो.

मला असं दिसतं, की विपुल अंतर्दृष्टीची गरज असलेले, वैचारिक सूक्ष्मता, शीघ्र मागोवा घेण्याची गरज असलेले विषय हाताळताना तुम्ही केवळ स्वतःसोबतच नव्हे तर वक्त्यासोबतही सहमेलनात असणं आवश्यक आहे. त्यामुळे श्रोता या नात्याने तुमचं काम दुप्पट अवघड आहे, कारण स्वतःशी संलाप साधताना, स्वतःला समजून घेतानाच तुम्हाला वक्त्याचं म्हणणं ऐकायचं आहे. जे शब्द तुम्ही ऐकत आहात त्यांना खास महत्त्व चिकटवून चालणार नाही, शब्दांवरच थांबून चालणार नाही. तुम्ही काळजीपूर्वक आस्थेने ऐकायला हवं, कलुषित न होणाऱ्या, अर्थांतर न करणाऱ्या, तुलना न करणाऱ्या उत्कटतेने. याकरता प्रचंड विनियोग लागतो, हे अफाट कार्य आहे. कारण आपण राजकीय, सामाजिक सुधारणेसारख्या फुटकळ विषयांवर शिळोप्याच्या गप्पा मारत नाही आहोत. आपण मानवी अस्तित्वाला थेट गाभ्यापर्यंत स्पर्शणाऱ्या गोष्टींबद्दल बोलत आहोत.

...मागच्या संवादात आपण म्हटलं होतं की आपण अगदी खोल, मुळाशी जात आहोत, प्रश्न विचारत आहोत, आपल्या असण्याच्या सत्त्वाची मीमांसा करत आहोत. आपण आपल्या मनाचं, आपल्या असण्याच्या सबंध संरचनेचं खरोखर अन्वेषण करत आहोत, वक्त्याच्या साहचर्याने तुम्हीही ते करत आहात. म्हणूनच तुम्ही स्वतःशी व वक्त्याशी समन्वय साधणं आवश्यक आहे. अन्यथा तुमच्या व वक्त्यामधील संभाषण तत्काळ संपुष्टात येतं, तुम्ही भलतीकडे वाहवत जाता, वक्तासुद्धा बोलण्याच्या ओघात अन्य ठिकाणी पोहोचलेला असतो.

तेव्हा तुमच्या पुढ्यात असलेलं काम तुमच्या ध्यानात आलं असेल अशी मी आशा करतो. मी हे काम तुमच्या पुढ्यात ठेवत नाही, तुम्हीच ते स्वतःपुढे ठेवत आहात. कोणाहीसोबत सहमेलनात असण्याचा तेवढा एकच मार्ग आहे - मग तो निसर्ग असो, ढग असो, सूर्यास्ताचं सौंदर्य असो वा तुमची पत्नी, तुमची मुलं असोत, तुमचे शेजारी असोत वा कामाच्या ठिकाणचे तुमचे वरिष्ठ असोत. आपण दोघे जे काही बोलत असू, विचारविनिमय करत असू वा ऐकत असू त्याच्याशी आपलं सरळसरळ नातं असेल अशा अवधानाच्या अवस्थेत तुम्ही असायला हवं. कृपया याचं महत्त्व लक्षात घ्या, नाहीतर तुमच्या व वक्त्यामध्ये नातं निर्माण होऊ शकणार नाही.

जेव्हा हे स्पष्ट होतं - जेव्हा तुमचं मन इतस्ततः भटकत नसतं, दमलेलं, मरगळलेलं नसतं, कसल्याशा विचारांत हरवलेलं नसतं; जेव्हा तुम्ही ऐकाल - अर्थ न लावता, तुलना, मूल्यमापन न करता साक्षात् ऐकाल - तेव्हा तुम्हाला कळेल आपण दोघे मिळून आपल्या असण्याच्या अगदी खोल गाभ्याची यात्रा करत आहोत. आपल्या मनात, अंतरंगात वसणाऱ्या सर्व यातना, सर्व अडचणी, सर्व समस्या आपण अनावृत करत आहोत, शोधून काढत आहोत.

मुंबई, १९६४, द्वितीय जाहीर भाषण

संवाद आणि द्वंद्वात्मक विचारणा

मला वाटतं संवाद आणि द्वंद्वात्मक विचारणा या दोन भिन्न गोष्टी आहेत. शब्दकोशानुसार द्वंद्वात्मक प्रश्नोत्तरं वा चौकशी म्हणजे मतांच्या तार्किक देवघेवीतून, टकरावातून सत्यशोधन करणं. द्वंद्वात्मक मार्गाचा हा झाला शब्दशः अर्थ. याउलट एकमेकांना पुष्कळ नीटसं ओळखणाऱ्या मित्रांमध्ये घडतो तो संवाद - एकमेकांच्या शब्दसंपदेची, शब्दप्रयोगांची त्यांना कल्पना असते आणि सच्च्या शोधक प्रेरणेने, एकत्रितपणे ते सत्याचा शोध घेतात - ठाम मतं मांडून नव्हे. तेव्हा तुम्हाला काय हवंय ते तुम्ही ठरवावं - एकतर मतमतांतरांमधून सत्याचा तपास करणं - याबद्दल मी साशंक आहे कारण मत म्हटलं की त्यातून पूर्वग्रह, व्यक्तिगत ढब इत्यादी सूचित होतं; किंवा संवाद. आपणा दोघांनाही एखाद्या समस्येत खोलवर रस असणं, आपण पूर्वग्रहबाधित नसणं, कोणत्याही ठोस उत्तराची अपेक्षा नसणं हे संवाद साधताना अभिप्रेत असतं. आपण दोघे मिळून त्या समस्येचं सत्यान्वेषण करत असतो. यामधील फरक तुमच्या लक्षात येतो आहे का? एक मार्ग द्वंद्वात्मक सरणीचा तर दुसरा विचक्षणाचा, अ-स्वीय (non-personal), वस्तुगत (objective) अन्वेषणाद्वारे सत्याकडे जाणं. याचाच अर्थ आपण मतं, निष्कर्ष, प्रतिपादनांसह सुरुवात करत नाही. दोन मित्र, म्हणजेच एखाद्या समस्येबद्दल कळकळ असलेली दोन माणसं या नात्याने आपण तिची एकत्र चिकित्सा करतो, तिची देवघेव करतो आणि मग कदाचित आपल्याला सत्य गवसतं. बरोबर? तेव्हा आपल्या या संवादांमधून आपण मतं, पूर्वग्रह वा निष्कर्षांच्या वाटेने जाणार नाही आहोत हे जर स्पष्ट झालं असेल; तपास करताना जर आपण दोघेही खुले असू, गोष्टी वस्तुगतरित्या पाहण्यास मोकळे असू तर आपण सुदूर जाऊ शकतो.

सानेन, २८ जुलै १९७६, प्रथम जाहीर भाषण

सहचिंतन

पुढील सहा दिवस आपण काही गोष्टींबद्दल बोलणार आहोत. या तथाकथित चर्चा म्हणजे नेमकं काय याबद्दल आपल्याला स्पष्टता असणं गरजेचं आहे असं मला वाटतं. हा संवाद आहे, निरनिराळ्या समस्यांवर परस्परांशी गांभीर्याने केलेलं संभाषण आहे. केवळ सावधपणे, विश्लेषणात्मकरित्या समस्यांत न शिरता प्रत्येक समस्येचा समग्र रूपबंध पाहणं – फक्त मोजके तपशीलच नव्हेत तर संपूर्ण आकार, संपूर्ण आशय. वक्ता व तुमच्यामधील हे संभाषण, संवाद असल्या कारणाने तो साधताना आपण भेद्य असावं, संवेदनशील असावं. बचावात्मक पवित्रा घेता कामा नये, प्रतिरोध करता कामा नये. केवळ समस्येलाच नव्हे तर समस्येत जे जे अंतर्भूत असेल त्या साऱ्यापुढे साफ उघडं पडण्याची, पूर्ण अवधान देण्याची आपली तयारी असायला हवी.

आपला हा संवाद, संभाषण ही बौद्धिक करमणूक नाही, केवळ युक्तिवादांची देवघेव नाही. एका मताची अन्य मतासंगे, एका फॉर्म्युल्याची अन्य फॉर्म्युल्यासंगे, एका अनुभवाची इतर अनुभवांसगे लागलेली ही झुंज नव्हे. हे आहे थेट समस्येच्या आरपार बघणं. निव्वळ समस्येपासून सुटका करून घेण्याइतका, तिच्यापलीकडे जाण्याइतका मर्यादित रस नसणं; सर्व समस्या निकालात काढू शकेल अशी शक्कल वा फॉर्म्युला शोधून काढण्यास उतावीळ नसणं. तेव्हा आपण कल्पनांशी खेळत नाही आहोत, तुमच्या वा वक्त्याच्या कल्पनांमधे आपल्याला स्वारस्य नाही. वास्तवाबद्दल, 'जे आहे', जे प्रत्यक्षात आहे त्याबाबत आपल्याला आस्था आहे.

जे प्रत्यक्षात आहे त्यापासून – जे आहे असं आपल्याला वाटतं, जे असावं असं आपल्याला वाटतं ते नव्हे – आपण सुरुवात करत आहोत, हे जर आपणाला व वक्त्याला मान्य असेल तर संवाद साधताना आपल्यामधील नातं पूर्णतः भिन्न असेल, ते एकतर्फी नसेल. जे काही म्हटलं जात आहे त्यापैकी कशाचाही अस्वीकार न करता त्याबद्दल असंरक्षित, विवृत असणं हितावह ठरेल. मग आपण अतिशय संवेदनक्षम होऊ लागतो, खुद्द त्या समस्येबद्दल जागरूक होऊ लागतो. जर हे थोडंफार स्पष्ट झालं असेल – पुढले सहा दिवस रोज सकाळी आपण भेटू तसतसं ते स्पष्ट होत जाईल अशी मला आशा आहे – तर आपल्याला ग्रासणाऱ्या निरनिराळ्या प्रश्नांमधे शिरण्याचा आपल्याला लाभ होऊ शकेल.

सानेन, २ ऑगस्ट १९६७, प्रथम जाहीर भाषण

Statement about ownership and other particulars of Antarlahari Newsletter

Form IV

1. Place of Publication	:	Krishnamurti Foundation India, Mumbai Executive Committee Himmat Niwas, 31, Dongersey Rd., Malabar Hill, Mumbai - 400 006.
2. Peridicity of Publication	:	Once in four months, (January, May, September)
3. Printer's Name	:	P. V. Dabholkar
Whether citizen of India	:	Yes
Address	:	Krishnamurti Foundation India, Mumbai Executive Committee Himmat Niwas, 31, Dongersey Rd., Malabar Hill, Mumbai - 400 006.
4. Publisher's Name	:	P. V. Dabholkar
Whether citizen of India		Yes
Address	:	Krishnamurti Foundation India, Mumbai Executive Committee Himmat Niwas, 31, Dongersey Rd., Malabar Hill, Mumbai - 400 006.
5. Editor's Name	:	Vasanti Padte
Address	:	Krishnamurti Foundation India, Mumbai Executive Committee Himmat Niwas, 31, Dongersey Rd., Malabar Hill, Mumbai - 400 006.
6. Name and address of individuals who own the newspaper and partners or shareholders holding more than one percent of the total capital	:	Krishnamurti Foundation India, Mumbai Executive Committee Himmat Niwas, 31, Dongersey Rd., Malabar Hill, Mumbai - 400 006.

I, P. V. Dabholkar, hereby declare that the particulars given are true to the best of my knowedge and belief.

Sd
(P. V. Dabholkar)

'अंतरलहरी' ही वृत्तपत्रिका दर चार महिन्यांनी प्रसिद्ध होणारी पत्रिका आहे. कृष्णजींच्या शिकवणीचा अभ्यास करू इच्छिणाऱ्या व्यक्तींसाठी कृष्णमूर्तींच्या साहित्याची मराठी भाषांतरे, त्यांच्या शिकवणीसंबंधी लेख, संस्थेच्या उपक्रमांची, अभ्यासकेंद्रांची तसेच पुस्तके वगैरेंची माहिती इ. ह्या पत्रिकेत प्रकाशित केली जाईल. आपल्याला ही पत्रिका घरपोच हवी असल्यास आमच्या मुंबई केंद्राच्या पत्त्यावर पत्र किंवा ई-मेल द्वारा कळवावे. कृपया आपले नाव, संपूर्ण पत्ता, दूरध्वनी आणि ई-मेल ही माहिती कळवावी.

www.kfimumbai.org

मराठी, गुजराथी आणि इंग्रजी भाषांमधील संकेतस्थळ

फाउंडेशनच्या इंग्रजी, मराठी आणि गुजराथी प्रकाशनांबद्दल माहिती, तसेच मराठी व गुजराथी पुस्तके जगभरातील सर्व देशांमधून विकत घेण्याची सोय.
वाचकांना आंतरजालावर आपल्या मातृभाषेत कृष्णमूर्तींच्या जीवनदृष्टीचा वेध घेण्याची ही एक विशेष संधी आहे.

कृष्णमूर्तींविषयीच्या काही वेबसाईटस्:

www.jkrishnamurti.org
www.kfionline.org
www.rishivalley.org
www.rajghatbesantschool.org
www.kfistudy.org
www.kscskfi.com
www.jkrishnamurtionline.org
www.kfa.org
www.kfoundation.org
www.kinfonet.org
www.kfimumbai.org

Published in January, May, September

Periodical

Registered with The Registrar of Newspapers for India under No. MAHMAR/2008/25259

If undelivered please return to :
Krishnamurti Foundation India
Mumbai Executive Committee, Himmat Niwas, 31, Dongersey Road,
Malabar Hill, Mumbai - 400 006.
Tel.: (022) 2363 3856 Email : kfimumbai@gmail.com
Websites : kfimumbai.org, kfionline.org, jkrishnamurti.org

Printed and Published by SHRI P V DABHOLKAR on behalf of KRISHNAMURTI FOUNDATION INDIA, MUMBAI EXECUTIVE COMMITTEE, HIMMAT NIWAS, 31, DONGERSEY ROAD, MALABAR HILL, MUMBAI 400 006. Editor : SMT. VASANTI PADTE
Printed at INDIA PRINTING WORKS, 42, G. D. AMBEKAR MARG, WADALA, MUMBAI 400 031.